36800619

Receipt (pavti)

212/3524

Wednesday,September 30 ,2026

3:30 PM

पावती

Original/Duplicate

नोंदणी क्रं. :39म

Regn.:39M

पावती क्रं.: 5370 दिनांक: 30/09/2026

गावाचे नाव: **वडाळी**

दस्तऐवजाचा अनुक्रमांक: **अरग-3524-2026**

दस्तऐवजाचा प्रकार : **खरेदीखत**

सादर करणाऱ्याचे नाव: **अर्पित जितेंद्र देशमुख**

नोंदणी फी	रु. 30000.00
दस्त हाताळणी फी	रु. 1000.00
पृष्ठांची संख्या: 25	
एकूण:	रु. 31000.00

मुळ दस्तएवज परत केला
दि. 30/09/26

सह दु.नि.अमरावती (ग्रामीण)

आपणास मूळ दस्त ,थंबनेल प्रिंट,सूची-२ अंदाजे
3:49 PM ह्या वेळेस मिळेल.

बाजार मुल्य: रु.3543091.2 /-
मोबदला रु.7075000/-
भरलेले मुद्रांक शुल्क : रु. 424500/-

1) देयकाचा प्रकार: DHC रक्कम: रु.1000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: 0926300308298 दिनांक: 30/09/2026
बँकेचे नाव व पत्ता:
2) देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.30000/-
डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH011109505202627E दिनांक: 30/09/2026
बँकेचे नाव व पत्ता:

CHALLAN

MTR Form Number-6

GRN	MH011109505202627E	BARCODE		Date	29/09/2026-23:06:52	Form ID	25.1

Department	Inspector General Of Registration	**Payer Details**	
Type of Payment	Stamp Duty and Registration Fee together Registration Fee	TAX ID / TAN (If Any)	
		PAN No.(If Applicable)	IEBXXXXXXE
Office Name	AMC_AMRAVATI RURAL SUB REGISTRAR	Full Name	Arpit Jitendra Deshmukh
Location	AMRAVATI		
Year	2026-2027 One Time	Flat/Block No.	FS No. 86

Account Head Details	Amount In Rs.		
		Premises/Building	
0030046401 Stamp Duty	424500.00	Road/Street	Plot No. 77, 78 with House
0030063301 Registration Fee	30000.00	Area/Locality	Wadali
		Town/City/District	
		PIN	4 4 4 6 0 2
		Remarks (If Any)	
		PAN2=IDMPK4004D~SecondPartyName=Ushatai Ambadas Kothale~	
		Amount In Words	Four Lakh Fifty Four Thousand Five Hundred Rupees Only
Total	454,500.00		

Payment Details	BANK OF MAHARASHTRA	**FOR USE IN RECEIVING BANK**			
Cheque-DD Details		Bank CIN	Ref. No.	02300042026092922411	039676260
Cheque/DD No.		Bank Date	RBI Date	29/09/2026-23:09:19	Not Verified with RBI
Name of Bank		Bank-Branch		BANK OF MAHARASHTRA	
Name of Branch		Scroll No. , Date		Not Verified with Scroll	

Department ID : Mobile No. : XXXXXX0000

NOTE:- This challan is valid for document to be registered in Sub Registrar office only. Not valid for unregistered document.

सदर चलन केवळ दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करावयाच्या दस्तांसाठी लागु आहे. नोंदणी न करावयाच्या दस्तांसाठी सदर चलन लागु नाही.

अ-र-ग

3428 | 9-24

२०२६

The Seal of the Joint Sub-Registrar Amravati-Rural, Dist. Amravati

सह दुय्यम निबंधक अमरावती-ग्रामीण जिल्हा अमरावती, महाराष्ट्र राज्य

Print Date 29-09-2026 11:09:43

Document Handling Charges

Department of Registration and Stamps, Maharashtra

Receipt of **Document Handling Charges**			
PRN :	0926300308298	**Payment Date :**	30/09/2026

Received from **Arpit Jitendra Deshmukh**, Mobile number **9372791423**, an amount of Rs.**1000/-** towards **Document Handling Charges** for the **iSARITA 1.9** in the Joint District Registrar office of the District **Amravati**.

Payment Details			
Bank Name :	SBIN	**Receipt Date :**	30/09/2026
Bank CIN :	10029762026093008055	**REF No. :**	7662874739223

This is computer generated receipt, hence no signature is required.

अ-र-ग

3528 | 2-25

२०२६

The Office of the Joint Sub-Registrar Amravati-Rural

महाराष्ट्र राज्य

Dist. Amravati

अ-र-ग
3428 | 3-25
२०२६

स्थावर मालमत्ता (प्लॉटसह घराचे) खरेदीखत

मौजे - वडाळी, वि.क्र. ७.७४,

दर प्रति चौ.मी. खुला प्लॉट रू. ५,२८०/-, बांधकाम रू. २६,४००/-

शासकीय दरानुसार किंमत रू. ३५,५०,०००/-

लावण्यात आलेले मुद्रांक शुल्क रू. ४,२४,५००/-, नोंदणी फी रू. ३०,०००/-

एकुण सौदा किंमत रू. ७०,७५,०००/-

(रू. सत्तर लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त)

शासनाचे नियमानुसार मुद्रांक शुल्क लावलेले आहे.

लिहुन घेणार : **श्री. अर्पित जितेंद्र देशमुख** (PAN - IEBPD2707E)
आधार कार्ड - 2143 6303 0759
वय - २२ वर्षे, व्यवसाय - व्यापार/नौकरी,
रा. फ्लॅट नं. एस१-बी, बिल्डींग नं. १, एस्पायर रेमेडीज च्या वर,
दौलत विहार, दौलत वाडी, नागपूर - ४४००२३

यांसी,

लिहुन देणार : **उषाताई अंबादास कोठाळे** (PAN - IDMPK4004D)
आधार नं. 7818 9125 4200
वय - ९० वर्षे, व्यवसाय - गृहीणी,
रा. गल्ली नं. २, संतोषी माता मंदिर जवळ,
यशोदा नगर नं. २, अमरावती - ४४४६०६

ई.स. २०२६ साल कारणे स्थावर मालाचे खरेदीखत लिहुन देते, ते येणेप्रमाणे :-

१. **मिळकतीचे वर्णन** :- ''नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व म.न.पा. अमरावती चे हद्दीतील **मौजे - वडाळी**, प्रगणे - बडनेरा, ता. जि. अमरावती, येथील **शेत स.नं. ८६** मधील जमिनीचे रा.मा. क्र. एन.ए.ए.-४८/वडाळी/१९८६-८७, नि.ता. ०७.०५.१९८७ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजुर झालेल्या जागेतील **लेआऊट प्लॉट नं. ७७ (सत्याहत्तर)** व **७८ (अठ्याहत्तर)**, दोन्ही मिळुन संगणकीकृत ७/१२ प्रमाणे **भुमापन क्र. व उपविभाग क्र. ८६/७७/७८**, याची साईज पुर्व व पश्चिम बाजु ६० फु., उत्तर व दक्षिण बाजु ४० फु. असून याचे एकुण **क्षेत्रफळ २२३.०४ चौ.मि. (२४००.०० चौ. फूट)** आहे. या जागेवर खुप जुने बांधलेले घर, याचे एकुण **बांधकाम क्षेत्रफळ ११२.०० चौ.मि.** व यात असलेले विद्युत मिटर, विद्युत फिटींग केलेल्या वस्तु, नळ जोडणी आणि जमिन संलग्न सर्व तदंगभुत वस्तुसह, याचा म.न.पा. मालमत्ता क्र. १०७, जुना संगणक क्र. ०२२७०००८५, वार्ड क्र. सी-२ आहे. याची चतु:सिमा :-

अ–र–ग

३५२८ | ४–२४

२०२६

पुर्वेस - १८ फुट रूंदीचा रोड,
पश्चिमेस - १० फुट रूंदीची गल्ली,
उत्तरेस - १० फुट रूंदीचा रोड,
दक्षिणेस - प्लॉट नं. ७६...'

(उपरोक्त चर्तु:सिमेतील जागेसह घर हे या खरेदीखताचा विषय असुन ज्याला यापुढे 'सदर्हू मिळकत' म्हणून संबोधित केलेले आहे.)

२. सदर्हू मिळकतीखालील प्लॉट हा लिहुन देणार यांनी दि. २६.०२.१९७३ रोजी दस्त क्र. २९८ वर दु.नि. अमरावती टाऊन यांच्याकडे नोंदविलेल्या खरेदीखतान्वये सौ. इंदूमतीबाई मनोहर सप्रे, रा. अमरावती यांच्याकडुन स्वकष्टाने अर्जीत रक्कमेतुन विकत घेऊन यावर स्वखर्चाने घराचे बांधकाम केले आहे. अशाप्रकारे सदर मिळकत ही लिहून देणार यांचे एकमेव मालकीची असून यावर त्यांच्याशिवाय इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, मालकी, हितसंबंध व ताबा नाही. लिहुन देणार हेच सदर्हू मिळकतीचे एकमेव मालक व ताबेदार झाले असून याची नोंद महसूल अभिलेखामध्ये रितसर घेण्यात आली व लिहुन देणार यांना त्यांच्या मर्जीनुसार सदर्हू मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा पुर्ण हक्क व अधिकार आहे.

३. लिहून देणार हे कायमस्वरुपी दुसऱ्या ठिकाणी वास्तव्याकरीता स्थायीक झाल्याने सदर्हू मिळकत लिहून देणार यांनी विकण्याकरीता काढली व लिहुन घेणारांनी उचित बाजारभाव देवु केल्यामुळे व हा सौदा लिहून देणार यांना व त्यांच्या कुटुबांच्या संप्रदाला लाभप्रद (Benefit of Family and Estate) असल्यामुळे सदर मिळकत लिहून देणार हे स्वतः व कुटूंबाच्या इतर सदस्यांच्या संमतीने लिहून घेणार यांना या खरेदीखतान्वये नेहमीकरिता हस्तांतरित करीत आहे.

४. <u>**भरण्याचा तपशील**</u> – एकुण खरेदीखत किंमत रू. ७०,७५,०००/– (रू. सत्तर लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त) लिहून घेणार यांनी लिहुन देणार यांना खालीलप्रमाणे दिले :–

रू.		विवरण
रू.	७,००,०००/–	चेक क्र. ०००००५७, दि. २१.०९.२०२६, कोटक महिंद्रा बँक, शाखा – अमरावती द्वारे मिळाले.
रू.	६३,००,०००/–	चा चेक क्र. २८५६९८, दि. २९.०९.२०२६ रोजीचा पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमि. तर्फे पंजाब नॅशनल बँकेचा ई.सी.ई. हाऊस, के.जी. मार्ग, न्यु दिल्ली शाखेचा मिळाला.
रू.	४,२५०/–	दि. २६.०९.२०२६ रोजी यु.पी.आय. नं. ६६३५०७७३५३९२ द्वारे लिहुन देणार यांच्या बँक खात्यात जमा झाले.
रू.	७०,७५०/–	लि.घे. हे टी.डी.एस. पोटी लि.दे. यांच्या वतीने शासकीय तिजोरीत भरेल.
रू.	**७०,७५,०००/–**	**अक्षरी – सत्तर लक्ष पंच्याहत्तर हजार रूपये फक्त**

अ-र-ग
३५२८ | ५-२५
२०२६ (३)

वरील प्रकारे लिहून देणार यांनी ही रक्कम खरेदी भरण्यापोटी घेतली आहे. लिहुन देणार यांची भरणा पावल्याबाबतची काही एक तक्रार राहिलेली नाही. भरणा पावल्याची पावती लिहून देणार हे या लेखान्वये लिहून देत आहे.

५. वरील भरण्याचे मोबदल्यात लिहुन देणार हे सदर्हू मिळकतीतील सर्व मालकी हक्क लिहून घेणार यांना या खरेदीखतान्वये विक्रीद्वारे संपुर्णपणे नेहमीकरिता हस्तांतरित करीत असुन लिहून घेणार यांनी सदर्हू मिळकतीचा पुर्ण व अबाधित मालकी हक्काने वंशपरंपरा उपभोग घ्यावा व मर्जीनुसार विल्हेवाट लावावी.

६. सदर्हू मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा इतर तदंगभुत वस्तुसह जागेवर मोजमाप करून व प्रत्यक्ष जाग्यावर असलेल्या संपुर्ण बांधकामासह लिहुन देणार यांनी लिहून घेणार यांना आज रोजी दिलेला आहे व लिहून घेणार यांनी प्रत्यक्ष ताबा (Vacant Possession) घेतलेला आहे.

७. सदर्हू मिळकत लिहुन देणार यांनी यापुर्वी दुसरे कोणासही अन्य लेखान्वये लिहून दिली नाही, तसेच सदर्हू मिळकतीवर लिहून देणार यांचे खेरीज इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही. यावर इतर कोणाचाही गहाण, बोजा, ताबा, कर्ज, हक्क, हितसंबंध, कुळ, जप्ती, वारसा, कौटूंबिक वाद, कचेरीवाद, वगैरेची भानगड नाही, तसेच सदर मिळकती संबंधीत कोणताही वाद कोणत्याही न्यायालयात प्रलंबीत नाही. तसे काही निघाल्यास व लिहुन घेणार यांचे मालकी हक्कास, उपभोगास व ताब्यास बाधा आल्यास किंवा कचेरीवाद आढळल्यास त्यास लिहुन देणार हे जबाबदार राहतील व लिहून घेणार यांच्या होणाऱ्या नुकसानीस लिहुन देणार हे त्यांचे इतर इस्टेटीतुन भरून देतील, लिहून घेणार यांना तोषीस खर्च लागू देणार नाही.

८. या मिळकतीस लागू असलेले पुर्वापार वहिवाटीचे, जाण्यायेण्याचे रस्त्याचे व इतर सर्व प्रकारचे इजमेंटचे हक्क देखील लिहुन देणार हे याच खरेदीखतान्वये लिहुन घेणार यांना हस्तांतरित करून देत आहे. सदर मिळकत विकल्यानंतर मौजे – वडाळी, शेत स.नं. ८६ मधील भुमापन क्र. व उपविभाग क्र. ८६/७७/७८ मध्ये लिहून देणार यांच्या नावाने किंवा मालकीची किंवा ताब्यात कोणतीही जागा/जमीन मालक म्हणून शिल्लक नाही.

९. या खरेदीखताचे आधारे लिहुन घेणार यांनी सरकारी हक्क नोंदणी रेकॉर्डमध्ये, महसुल अभिलेखात, म.न.पा. अभिलेखामध्ये सदर्हू मिळकतीसंबंधी मालकी हक्काचे फेरफार परभारे लिहून घेणार यांनी त्यांचे नावे नोंदवून घ्यावेत, त्यास लिहुन देणार यांची मुळीच हरकत नाही. जरूरत पडल्यास संबंधीत प्राधिकाऱ्यासमक्ष लिहून देणार हे स्वतः हजर राहून संमती देतील.

१०. सदर्हू मिळकतीस लागू असलेले सर्व प्रकारचे सरकारी, निमसरकारी कर, उपकर, अकृषक कर, विद्युत बिल, नळ बिल, ईतर देयके, वगैरे आज तारखेपावेतो लिहून देणार यांनी

अ-र-ग

३५२४ | ६-२५

२०२६

भरले आहे. काही थकबाकी आढळल्यास ते भरण्याची संपुर्ण जबाबदारी लिहुन देणार यांची राहील. खरेदी तारखेनंतरचे सर्व कर व देयके भरण्याची जबाबदारी लिहुन घेणार यांची राहील.

११. खरेदीला लागणारे मुद्रांक शुल्कासह खरेदीचा व नोंदणीचा संपुर्ण खर्च लिहुन घेणार फक्त यांनी केलेला आहे. तसेच ले-आऊट पास करतांना दिलेल्या अटी व शर्तीची पुर्तता लिहुन देणार यांनी केलेली आहे, अशी हमी लिहुन देणार या लेखान्वये लिहुन घेणार यांना देत आहे. सदर व्यवहार हा निव्वळ खरेदी-विक्रीचा असुन कोणत्याही प्रकारे सावकारी किंवा व्याजाचा व्यवहार नाही.

१२. सदर्हू मिळकतीच्या वर्णनात काही चुक किंवा उणीव, किंवा त्रुटी राहिल्यास त्याचे या खरेदीखताचे वैधतेवर कोणतेही परिणाम होणार नाही व लिहुन घेणार यांचे सदर्हू मिळकतीवरील मालकी हक्क अबाधित राहील.

१३. हे खरेदीखत लिहुन देणार यांनी सर्व तरतुदींचा अर्थ समजुन घेऊन स्वेच्छेने लिहुन दिलेला आहे व सदर्हू मिळकतीवर खरेदी घेणार, त्यांचे वारसदार वा त्यांचे हितसंबंधाचे उत्तराधिकारी यांचे मालकी हक्कास अधिक पक्केपणे आश्वस्त करण्याचे दृष्टीने जरूर पडल्यास मागणाऱ्या इसमाचे खर्चाने, लिहून देणार हे आवश्यक ती सर्व आश्वासक कृत्ये करून देण्याचे कबूल करीत आहे.

१४. सदर्हू मिळकतीसंबंधी दि. २६.०२.१९७३ रोजी दस्त क्र. २९८ वर दु.नि. अमरावती टाऊन यांच्याकडे नोंदविलेल्या खरेदीखतान्वये लिहून देणार यांना प्राप्त झालेले सर्व हक्क व अधिकार वगैरे (जे काही या खरेदीखतामध्ये अनावधाने नमुद करण्याचे राहुन गेले असेल ते सर्व हक्क) याच खरेदीखतान्वये लिहून घेणार यांना कायमस्वरूपी हस्तांतरीत करून बहाल करीत आहे.

१५. या दस्तात नमूद केलेल्या सर्व करारांना व ठरावांना शक्यतो तो संपुर्ण वाक्य परिणाम मिळण्याचे दृष्टीने जिथे जिथे असे निर्वचन आवश्यक असेल तिथे तिथे 'लिहुन घेणार' आणि 'लिहून देणार' या शब्द प्रयोगात त्यांचे संबंधित वारसदार, कायदेशिर प्रतिनीधी, उत्तराधिकारी, व अभिहस्तांकिती यांचाही समावेश मानला जाईल व तो त्यांचेवर बंधनकारक राहील.

हे खरेदीखत लिहुन देणार यांनी त्यांचे राजीखुशीने व सावध असतांना वाचुन समजुन आज दि. ३०.०९.२०२६ रोजी अमरावती येथे लिहुन दिले आहे. ते संबंधित सर्व पक्षांच्या इस्टेट वारसांस नेहमीकरिता लागु व बंधनकारक राहील व असे.

टंकलेखन : श्री. अग्रवाल कंप्युटर्स, अम. मो. 9372791423

अ-र-ग

3428 | 6-24

२०२६

लिहुन घेणार चे नांव :- अर्पित जितेंद्र देशमुख

पासपोर्ट फोटो	अंगठ्याचा ठसा	स्वाक्षरी
		

लिहुन देणार चे नांव :- उषाताई अंबादास कोठाळे

पासपोर्ट फोटो	अंगठ्याचा ठसा	स्वाक्षरी
		उषा अं. कोठाळे

साक्षीदार क्र. १ चे संपुर्ण नांव :- प्रमोद माणिकराव इंगोले

आय.डी. पुरावा/क्रमांक :- आधार कार्ड - 6822 1981 5718

स्वाक्षरी P.M.Ingole

साक्षीदार क्र. २ चे संपुर्ण नांव :- लता सुरेशराव भेंडे

आय.डी. पुरावा/क्रमांक :- आधार कार्ड - 9540 2779 3053

स्वाक्षरी LSBhende